**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५०/२०२०** **दिनांक २३/०६/२०२०** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १७/०६/२०२० ते २३/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २४/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून २८/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७/०६ | १८/०६ | १९/०६ | २०/०६ | २१/०६ | २२/०६ | २३/०६ | | २४/०६ | २५/०६ | २६/०६ | २७/०६ | २८/०६ |
| - | १.० | ७७.६ | ०.० | २.० | ३०.० | - | **पाऊस (मिमी)** | २७ | १५ | १४ | २५ | ३५ |
| - | ३४.२ | ३३.० | ३३.६ | ३४.२ | ३४.८ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३४ | ३३ | ३३ | ३३ | ३२ |
| - | २४.२ | २५.० | - | २४.६ | २५.० | - | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २४ | २५ | २५ | २५ |
| - | ३ | ६ | ४ | ४ | ६ | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ५ | ७ | ७ | ७ |
| - | ८१ | ८३ | - | ७८ | ८६ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९३ | ९२ | ९२ | ९३ |
| - | ७४ | ६९ | ७० | ७६ | ७१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ८३ | ७५ | ७५ | ७७ | ७६ |
| - | ०.० | ०.० | ३.७ | ०.० | ०.० | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ९ | १० | १० | १० | ८ |
| - | शांत | शांत | आ. | शांत | शांत | - | **वाऱ्याची दिशा** | द. | द. | द. | द. | द. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २४ ते २८ जून, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मध्यम पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोपवाटिका** | • पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा क्षेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया खताचा दुसरा हप्ता देण्यात यावा.<br>• बांधावरील खेकड्यांच्या नियंत्रणासाठी पावसाळ्याच्या सुरुवातीला सलग २ ते ३ रात्री बांधावरील खेकडे बत्तीच्या उजेडात पकडून त्यांची संख्या कमी करावी आणि नंतर विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही). |
| **नागली** | **रोपवाटीका** | • पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रति गुंठा क्षेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया खताचा दुसरा हप्ता देण्यात यावा. |
| **भेंडी** | **लागवड** | • भेंडी पिकाची लागवड सरी पद्धतीने ६० x ६० सें.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ६ टन चांगले कुजलेले शेणखत, २९ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा दयावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **वाढीची अवस्था** | • वेलवर्गीय भाजीपाला पिकांना काठीचा आधार दयावा किंवा मंडपाची व्यवस्था करावी. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**
**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**